# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

जा.क्र. मिडिया । 

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFACTION/ 55 /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–15112017
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

1445
15/11/17

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

ठाणे शहरातील वागळे इस्टेट वाहतुक उपविभागाच्या हद्दीत दिनांक १९/११/२०१७ रोजी "ठाणे पोलीस मॅरेथॉन स्पर्धा–२०१७ " चे ५, १० व २१ कि.मी. या प्रमाणे आयोजन करण्यात आले असून सदर स्पर्धेचा मार्ग खालील प्रमाणे आहे.

**मॅरेथॉन स्पर्धेचा मार्ग** :– रेमण्ड कंपनी मैदान व गेट मधून बाहेर–पोखरण रोड नं. १–वर्तकनगर नाका–शास्त्रीनगर नाका–देवदयानगर–शिवाजीनगर–संस्कार निकेतन स्कुल–उपवन–पोखरण रोड नं. २ मार्गे गांधीनगर बस स्टॉपच्या पुढे –४०० मीटर जावून तेथून यु–टर्न घेवून परत त्याच मार्गाने रेमण्ड कंपनी मैदानातात परत येवून समाप्त होणार आहे.

या स्पर्धेमध्ये सुमारे सात हजार स्पर्धक भाग घेणार असून स्पर्धा पहाण्यासाठी अतिथी व प्रेक्षकांची गर्दी होणार असल्यामुळे स्पर्धेच्या कालावधीत, स्पर्धेच्या मार्गावरील व परिसरातील वाहतुक सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(२) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून ,मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा, ठाणे शहर खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

१) उपवन, देवदयानगर व शास्त्रीनगर नाक्याकडून वर्तकनगर नाका मार्गे –कॅडबरी च्या दिशेने जाणाऱ्या वाहनाना नमूद नाक्यावरून दुभाजका लगतच्या लेनवरून (कॅडबरी नाक्या कडून उपवन च्या दिशेने येणाऱ्या मार्गावरून) वाहतुक सुरू ठेवण्यात येईल.

२) उपवन कडून बेथनी हॉस्पिटल समोरून पोखरण रोड नं. २ गांधीनगरच्या दिशेने जाणाऱ्या लेन लगतच्या लेनवरून वाहनांची ये–जा सुरू ठेवण्यात येईल.

३) पोखरण रोड नं. १ वरून देवदयानगर नाका मार्गे उपवनच्या दिशेने तसेच पोखरण रोड नं. २ गांधीनगर, बेथनी हॉस्पिटल समोरून उपवनच्या दिशेने जाणाऱ्या वाहनाना **देवदयानगर नाका** व **बेथनी हॉस्पिटल जंक्शन** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत असून सदरची वाहने निळकंठ हाईट –देवदयानगर मार्गे इच्छित स्थळी ये–जा करतील.

४) उपवन परिसरातील वाहनाना मॅरेथॉन स्पर्धेतील मार्गा लगतच्या लेन वरून सोईनुसार वाहतुकीस मुभा देण्यात येईल.

५) **मॅरेथॉन स्पर्धेच्या संपुर्ण मार्गावर –रस्त्याचे दोन्ही बाजूस सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.**

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसचुना ही पोलीस वाहने,रूग्ण वाहिका,फायर ब्रिगेड व इतर अत्यावश्यक सेवोतील वाहने तसेच मॅरेथॉन स्पर्धेतील व अतिथींचे वाहनास लागू राहणार नाही. **सदरची वाहतुक अधिसचुना ही दि. १९/११/२०१७ रोजी पहाटे ०४.०० ते १२.०० वा. पावेतो अथवा स्पर्धा संपे पर्यंत अमलात राहिल.**

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहुतक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/–सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.